I J R S S I S, Issue (IX), Vol. (I), May 2023: 108-112

A Double-Blind Peer Reviewed Journal

OPEN ACCESS

e-ISSN 2347 – 517X

Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES

© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# भारतातील धान उत्पादन शेतक—याचे मागासलेपण: एक सामाजशास्त्रिय अध्ययन

**डी एच उराडे**

रा म गांधी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सावली जि चंद्रपूर (म. रा.)

| Communicated : 16.01.2023 | Revision : 23.02.2023<br>Accepted : 21.03.2023 | Published : 30.05.2023 |
|---|---|---|

**सारांश :**

प्राचीन काळापासून भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीला महत्वाचे स्थान आहे. भारतीय लोकांचा मुख्य व्यवसाय हा शेतीच आहे.शेतकरी ग्रामीण भागात राहत असल्यामुळे त्याला इतर सोयी सवलतीपासून वंचीत राहावे लागते. कधी पाउस जास्त कधी कमी कधी दुष्काळ तर उत्पादन मालास कमी भाव मिळणे खरेदी विक्री करणा—या बाजारपेठेचा अभाव अशे अनेक घटक आहेत ज्या मूळे हा शेतकरी वर्ग मागासलेला आहे.शेतकारी विरोधी कायदे घटनादुरूस्ती लघू व सक्षम रोजगार निती अवलंब केल्यास मागासलेपण दूर होवू शकते. त्यांची जिवनावश्यक कायदयामधून सुळका होणे आवश्यक वाटते ज्याप्रमाणे साखर कापूस मसाले पदार्थ यांची निर्यात करण्यात येते त्याचप्रमाणे तांदळास ही संधी देण्यात यावी तसेच आयात तादळास बंदी असावीधान उत्पादक वर्गाचे योग्य प्रश्न सोडविण्यास सरकारणे मदत केल्यास त्यांचे प्रश्न सुटू शकते,विशेषता शेतकरी वर्ग मागासलेला आहे त्यांचे प्रश्न सरकारने जाणिवपूर्वक सोडविणे आवश्यक आहे असे वाटते.

**मुख्यशब्द** :तांदूळ शेतकरी बासमती

## प्रस्तावना :

प्राचीन काळापासून भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीला महत्वाचे स्थान आहे. भारतीय लोकांचा मुख्य व्यवसाय हा शेतीच आहे. भारतात एकून ६०५२४४ गावे असून त्यांची लोकसंख्या ७२.०२ टक्के एवढी आहे त्यापैकी ३.१७ टक्के लोक शेतमजूरीचे कामे करतात. शेतकरी तांदूळ गहू ज्वारी अन्य कडधान्य तेलवर्गीय व फळे पिके घेतात पण अजून पर्यत ७२ वर्षे त्यांचे मागासलेपण गेलेले नाही. पूर्वी आपला देश जास्त प्रमाणात तांदूळ गहू पिके घेत नव्हता तर सरकारला आयात करावी लागत असे पण हरितक्रांती नंतर धान्याचे मोटया प्रमाणात उत्पादन होवू लागले व देश स्वयपूर्ण झाला पण केंद्र व राज्य सरकारने अजून पर्यत तांदूळ निर्यात करण्यास परवानगी देत नाही. करीता विदर्भातील व अन्य प्रदेशातील शेतकरी गरिब व मागासलेपण जपणारा आहे. धान उत्पादन शेतकरी वर्ग उत्पादन करता त्याला प्रती क्विंटल २०३५ रू भाव केंद्र सरकारने जाहिर केलेला आहे. प्रत्यक्षपणे आपण बघितले असल्यास त्याला अत्यंत कमी भाव मिळतो. अनेक शेतकरी वर्ग ३००० रू प्रती क्विंटल शेकडा भाव मिळाला पाहिजे अशी भावना व्यक्त करतात, अनेक शेतक—याची मूलाखत घेतल्यावर कळून येते कि, येणारा खर्च वजा करता शेतकरी वर्गाकडे वर्षभर पूरेल असे अन्नधान्य घरी राहतच नाहि, बॅक सावकारी बचत गट नातेवाईक यांच्याकडून कर्ज घेतल्याशिवाय शेती पून्हा करू शकत नाही. शेतीला लागणारे साधने भरपूर असल्या शिवाय शेतकरी आपला विकास करू शकत नाही. धान उत्पादक शेतकरी विशेषत: ग्रमिण भागात राहतो. धानाचे पिक घेण्यासाटी जास्त प्रमाणात पाणी लागते पूर्व विदर्भ उत्तर महाराष्ट, गोंडवाना प्रांत बिहार मध्यप्रदेश छत्तीसगड झारखंड तेलंगना आद्रप्रदेश कर्नाटक तामिळनाडू प बंगाल ओरीसा आसाम पूर्वेकडील काही राज्य या भागात तादूळ पिकतो. या पिकासाटी पोषक वातावरण लागते. सूपिक काळी वारवशी जमीनीवर चांगली पिके योतात मूरमाळ व डोंगराळ जमिनीवर कमी पिके येतात या जमीनीवर धान पिके घेण्यासाठी मोठी कसरत करावी लागते शेतीवर बांधे टाकूण पाणी अडवावे लागते तेव्हाच धान पिक होतात.

तांदूळ पिक हे कमी मध्यम व जास्त कालावधीमध्ये होणारे असते धान पिकाचे अनेक प्रजाती आहेत बासमती चेन्नूर एचएमटी सूंवणे श्री १०१ श्रीराम गोल्ड अशा अनेक जातीचे धान पिके घेतली जातात. धानाचे स्वरूप ठोकळ मध्यम लांब बारीक असे विविध प्रकारचे तांदूळ पिके घेतली जातात. जवळपास तांडूळ पिके हे १२० ते६० दिवसात पूर्ण होत असते. जिथे पाणी भरपूर प्रमाणात आहे तिथे वर्षेभरातून तिनदा पिके घेतली जातात. काही ठिकाणी फक्त एकदाच व काही ठिकाणी दोनदा पिके घेतली जातात. काही भागामध्ये तांदळाचा वापर हा जास्त प्रमाणात खाण्यासाठी केला जातो. तांदळापासून तेल पोहे मुरमुरे इतर खाद्य पदार्थ बणविण्यासाठी वापर केला जातो. काही ठिकाणी रोज जेवण कर—यासाठी तांदळाचा वापर केला जातो संपूर्ण भारतामध्ये व काही देशामध्ये रोजच्या जेवणात वापरतात.पूर्वीपेक्षा अनेक प्रजाती धान पिकाच्या विकसीत झाल्या आहेत विशेषत: धान उत्पादक शेतकरी हा उपाशी राहू शकत नाही त्याचप्रमाणे आत्महत्या करण्याचे प्रमाण सुदधा या शेतक'याचे कमी प्रमाणात आहेत. धान उत्पादन घेण्यासाठी लागणारा खर्च हा जास्त प्रमाणात आहे भारतात विशेषत: सिंचनाची व विजेची सोच १२ महिणे झालेली नाही म्हणूनच शेतकरी जन्मापासून ते मरेपर्यत कर्जातव जगतो व मरतो देखील. मुलांचे शिक्षण विवाह पालनपोशण करण्यासाठी त्याला नेहमी कर्ज काडावे लागते. हा शेतकरी ग्रामीण भागात राहत असल्यामुळे त्याला इतर सोयी सवलतीपासून वंचीत राहावे लागते. कधी पाउस जास्त कधी कमी कधी दुष्काळ तर उत्पादन मालास कमी भाव मिळणे खरेदी विक्री करणा—या बाजारपेठेचा अभाव अशे अनेक घटक आहेत ज्या मूळे हा शेतकरी वर्ग मागासलेला आहे.जास्त पिके आल्यास कमी भाव मिळणे व कमी पिके आल्यास जास्त भाव मिळणे असे मागणी पूरवठयावर त्यांचे सामाजिक आर्थिक सांस्कृतिक बजेट ठरते त्यावेळी उत्पादन निधते तेव्हा कमी भाव असतो मे ते ऑक्टोबर या कालखंडात तांदळास भाव मिळते पण शेतकरी वर्गाकडे धानच असत नाही. खूप कमी प्रमाणामध्ये असते अशावेळी मोठे शेतकरी व व्यापारी यांनाच फक्त फायदा होतो. ज्यांना घान्य ठेवण्यासाठी घरे अपूरे असतात त्यांना शेती हि अकदी तोटयामध्येच असते.

**तथ्य संकलन पदधती व खर्चाचा तक्ता**

प्राथमिक व दिवतीयक स्त्रोताचा उपयोग तथ्य संकलन करण्याच्या पदधतीत वापर करण्यात आला. निरीक्षण मोखिक तंत्र पदधतीचा उपयोग करूण प्रश्नांच्या माध्यमातून उत्तरदात्यांची माहिती घेण्यात आली प्रत्यक्ष अनुभवादवारे तथ्यांचे संकलन करण्यात आले. मुलाखत देणा—यांचे प्रश्न जाणून घेवून माहिती घेण्यात आली. अनेक अडचणीना तोंड देवूण संशोंधन पूर्ण करण्यात आले. मिळालेल्या माहितीचे वग्रीकरण करूण त्यांची मांडणी करण्यात आली.

वरील तक्त्यावरूण हे लक्षात येते कि आज एक एकरमधे धान उत्पादन सरासरी ९ ते १० क्विंटल होते. त्याची किमत १८३१५ व खर्च होतो २३००० यावरूण लक्षात येते कि धान उत्पादक शेतकरी हा कर्जबाजारीच राहतो कारण ३१ मार्चपर्यत कोणत्याही परिस्थितीत बॅकेचे पैसे परतफेड करावे लागते सिंचनाची सोय नसेल तर एवढे सुदधा पिक होत नाही तर निसर्गावर अवलंबून राहावे लागते दरवर्षी उत्पादन कमी कमी होत आहे. तसेच जमाखर्चावरूण हे लक्षात येते कि शेतकरी हा नेहमी तोटयात राहतो. तो स्वत:ची रोजी कधीच घेत नाही तांदूळ खाण्यासाठी जे काही धान्य वापरतो अनेक शेतक—याची मुलाखत धेतल्यावर असे लक्षात येते कि सरकारी भाव जाहिर केलेला हा अत्यंत कमी आहे. ज्या शेतक—याची जमीन काळी कसदार असेल व विज पाण्याची व्यवस्था

असेल तरच उत्पादन खर्च निघतो विशेषत: ज्यांच्याकडे ३० एकरपेक्षा जास्त जमीन आहे हा शेतकरी नफा कमवितो.

**गृहितकृत्ये :—**

१ धान उत्पादन शेतकरी वर्गाचे मागासलेपण आहे

२ भात उत्पादक शेतकरी वर्ग सामाजिक व सांस्कृतिकदृष्टया कमकुवत आहे

३ धान उत्पादक शेतकरी वर्गाचे जिवनमान निम्न स्वरूपाचे आहे

**विषयाचे क्षेत्र :—**

भारतातील धान उत्पादक शेतकरी विशेषत: पूर्व विदर्भ क्षेत्र

**अध्ययनाचा उददेश :—**

धान उत्पादक शेतक—यांचे मागासलेपण शोधून काढणे व सामाजिक सांस्कृतिक दृष्टया मागासलेपणाची दरी शोधणे.

**विषयाचे महत्व :—**

धान उत्पादक शेतकरी हा स्वतंत्र असून त्यांचे आर्थिक सामाजिक सांस्कृतिक शोषण होते ते देशासमोर आणणे त्यांची वास्तविक परिस्थितीची कारणे शोधून शक्य होईल.

**संशोधन आराखडा :—**

संशोधन आराखडा हा संशोधन प्रक्रिचेची कार्ययोजना आहे. यामुळे संशोधन कार्यात येवू शकणा—या अडचणींचा आगावू अंदाज येतो. संशोधन आराखडा बनविणे म्हणजे कार्ययोजना आखणे होय. संशोधन आराखडयाचे अनूवेषनात्मक, निदानात्मक, वर्णनात्मक, प्रयोगात्मक असे काही प्रकार आहेत.

**वर्गिकरण मुलाखत अनुसुची :—**

| अ क | अल्पभुदारक १ ते २ एकर | भुदारक ३ ते १६ एकर | मोठा शेतकरी २० एकर पेक्षा जास्त | एकूण |
|---|---|---|---|---|
| शेतकरी | २४ | ६८ | ८ | १०० |
| महिला/ पुरूष | ४/२० | ०४/६४ | ०/ ८ | १०० |

वरील कोष्टकातील शेतक—यांचे वर्गिकरण केल्यास हे लक्षात येते कि मोठा शेतकरी वर्ग कमी प्रमाणात आहे. भूदारक वर्गाचे ज्रास्त प्रमाण आहे. अल्पभूदारकांची सुदधा कमी प्रमाण आहे. मोठया शेतकरी वर्गाकडे असणारी शेतजमीन ही चांगली असून सिंचनाची व्यवस्था असल्यामूळे त्यांचे उत्पादन चांगले येते. म्हणून त्यांची शेती तोटयामध्ये जाताना दिसत नाही पण अल्पभुदारक भुदारक शेतकरी यांचे उत्पादन मोटया शेतक—यापेक्षा कमी येते त्यामुळे त्यांचे मागासलेपणा दिसते. महिला पुरूष शेतक—यांचे उत्तरदाते म्हणून निवड करण्यात आली त्यांची मुलाखत घेण्यात आली विशेषता महिलांचे नावे शेतजमीन अत्यंत कमी आहे. वेगवेगळया स्तरातील उत्तरदात्यांची निवड करण्यात आली सर्वाची मागणी हि अनेक वर्षापासून धानाचे हमी भाव किमंत कमी आहे मजुरीचे दर रासायनिक खतांचे भाव वाढ होणे भांडवलाची कमतरता असणे सिंचणाची व्यवस्था कमी असणे चांगल्या प्रतिच्या ि बबियांची कमतरता असणे शेती मालास कमी भाव मिळणे बाजारपेठेचा अभाव नैसगिक आपत्ती कधी ओला तर कधी कोरडा दुष्काळ पडणे वन्यप्राण्यानी शेतीचे नुकसान होणे वेळेवर पिकविमा मंजूर न होणे दळणवळणांची साधने कमी असणे उदा. गडचिरोली जिल्हा अजूनही रेल्वे न येणे तिथे बारमाही पाणी असून तिथे धरण न होणे अजूनही काही शेतकरी विरोधी कायदे असणे शेतील उद्योगाचा दर्जा न मिळणे व त्यांच्यासाठी स्वतंत्र आयोग नसणे जमीन जंगल पाणी संबधी संविधानिक कायदे नसणे शिक्षण व तंत्रज्ञानाचा अत्यंत कमी वापर होणे अशी अनेक कारणे आहेत.

**उपाययोजना व निष्कर्ष :—**

१ शेतकरी वर्गाना कमी दरात कर्ज मिळाले पाहिजे

२ उत्पादन खर्च व नफा मिळेल असे तांदळास भाव मिळणे

३ शेतीसाठी स्वतंत्र आयोग निर्माण करणे

४ बारमाही शेतीसाठी विज व पाणी मोफत देणे

५ ३१ मार्चपर्यत कर्ज परत फेडीची मर्यादा उठविणे

६ कृषि व तंत्रज्ञान महाविद्यालये काढणे

७ तांदूळ निर्यात करण्यास परवानगी देणे

८ प्रशासन अधिकारी व शेतकरी यांचे संबध चागंले राहण्यास भर देणे

९ जंगल जमीन पाणी संबधी प्रश्न सोडविण्यास घटना दुरूस्ती करणे

१० ग्राम सभेला महत्व देवून शेतीपुरक लघुउदयोग निर्माण करणे

**निष्कर्ष :**

धान उत्पादक वर्गाचे योग्य प्रश्न सोडविण्यास सरकारणे मदत केल्यास त्यांचे प्रश्न सुटू शकते, केंद्र सरकार त्यांच्यासाठी वेगळा आयोग निर्माण करूण कृषी मंत्रालय त्यांचे प्रश्न आजपर्यत सोडवू शकला नाही शिफारस करूण सुदधा केंद सरकार त्यापेक्षा कमी जाहिर करतो विशेषता हा वर्ग मागासलेला आहे त्यांचे प्रश्न सरकारने जाणिवपूर्वक सोडविणे आवश्यक आहे असे वाटते. १९५० पासून अजून पर्यत तांदळाची निर्यात करण्यास सरकार परवानगी देत नाही काही प्रमाणात बासमती तांदळास दिलेली आहे. शेतकारी विरोधी कायदे घटनादुरूस्ती लघू व सक्षम रोजगार निती अवलंब केल्यास मागासलेपण दूर होवू शकते. त्यांची जिवनावश्यक कायदयामधून सुळका होणे आवश्यक वाटते ज्याप्रमाणे साखर कापूस मसाले पदार्थ यांची निर्यात करण्यात येते त्याचप्रमाणे तांदळास ही संधी देण्यात यावी तसेच आयात तादळास बंदी असावी उच्च प्रतिच्या तांदळास योग्य भाव मिळावे. शेतकरी श्रमास महत्व दयावे. नफयामधून त्यांच्या रोजीचा विचारच केलेला नाही. त्यांना ५८ वर्षापासून पेंशन योजना लागू करावी अनू सूचीत जाती जमाती इतर मागासवर्ग या गटातील सर्व शेतकरी यांची परिस्थिती समान आहे. कर्जबाजारीपणा शिक्षण विज्ञान तंत्रज्ञानाचा अभाव काही प्रमाणात अंधश्रछधा आळस वेसणाधिनता बाजारपेठेचा अभाव जातिय भावना पूंजीवाद दिसून येतो. वर्षभर सिंचन व विजमोफत मिळाल्यास सुधारणा होवू शकते.

**संदर्भः**

भारतीय समाज संरचनात्मक समस्या : लेखक – डॉ बि एम क–हाडे प्रकाशक – पिंपळापुरे ॲड पब्लिश नागपूर

भारतीय समाज प्रश्न व समस्या : लेखक – प्रा. डॉ प्रदिप आगलावे प्रकाशक – साईनाथ प्रकाशन नागपूर

तक्ता क्रमांक – १) २०२० – २१ ( जमीन – १.५९ हेक्टर आर )

| अ क्र | तपशिल | खर्च | उत्पादन |
|---|---|---|---|
| १ | टाक्टर खर्च | ८५०० | उत्पादन –४८२०० |
| २ | परे खर्च | १८०० | |
| ३ | रोवणा खर्च | ११४०० | तोटा – ७०८० |
| ४ | पारे | २८०० | |
| ५ | धान बिजाई | २८०० | |
| ६ | खते | ४६०० | |
| ७ | कापणी/ बांधणी | १३५०० | |
| ८ | चुराई | ३३८० | |
| ९ | हमाली | ८०० | |
| १० | इतर खर्च | ४६०० | |
| ११ | वाहतूक खर्च | ११०० | |
| | **एकूण** | **५५२८०** | |

तक्ता क्रमांक – २) २०२१ – २२ ( जमीन – १.५९ हेक्टर आर )

| अ क्र | तपशिल | खर्च | उत्पादन |
|---|---|---|---|
| १ | टाक्टर खर्च | १९२०० | उत्पादन– ७३४०५ |
| २ | परे खर्च | ३६०० | |
| ३ | रोवणा खर्च | १४००० | तोटा – २६७० |
| ४ | पारे | २८०० | |
| ५ | धान बिजाई | ३७०० | |
| ६ | खते | ४६०० | |
| ७ | कापणी/ बांधणी | १४२०० | |
| ८ | चुराई | ४२२० | |
| ९ | हमाली | १८५० | |
| १० | इतरखर्च/ निंदा | ५२०० | |
| ११ | वाहतूक खर्च | ३६०० | |
| | **एकूण** | ७६०७५ | |

तक्ता क्रमांक – ३) २०२१ – २२ ( जमीन – ०.४० हेक्टर आर )

| अ क्रं | तपशिल | खर्च | उत्पादन |
|---|---|---|---|
| १ | टाक्टर खर्च व परे | ४४०० | उत्पादन – १८३१५ |
| २ | रोवणा खर्च | ७५०० | |
| ३ | पारे | ७०० | तोटा – ४४८५ |
| ४ | धान बिजाई | १००० | |
| ६ | खते | १८०० | |
| ७ | कापणी/ बांधणी | ४००० | |
| ८ | चुराई | २००० | |
| ९ | इतरखर्च | १५०० | |
| १० | वाहतूक खर्च | ६०० | |
| | एकूण | २३००० | |